पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १७५। किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार २१/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची साथ परंपरा...
राजेन्द्र

# दिल्लीत विद्यार्थ्यांचे आंदोलन चिघळले, संसदेला घेरण्याचा प्रयत्न





नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

नीट पेपरफुटीसह शिक्षण व्यवस्थेतील कथित त्रुटींवर सुधारणा कराव्यात आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी 'कॉकरोच जनता पार्टी'ने जंतर-मंतर येथे सुरू केलेल्या आंदोलनाला सोमवारी नाट्यमय वळण मिळाले. आंदोलनाचे समर्थन करणारे ज्येष्ठ पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांना जबरदस्तीने रुग्णालयात हलविण्यात आल्याचा आरोप करत पक्षाने थेट संसद घेरावाची हाक दिली. या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळत हजारो आंदोलक संसदेकडे कूच करताच दिल्लीत तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

जंतर-मंतरवरून संसदेकडे निघालेल्या मोर्चाला अडविण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. मात्र आंदोलकांनी पुढे जाण्याचा निर्धार कायम ठेवत घोषणाबाजी सुरूच ठेवली. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार झटापट झाली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी लाठीचार्ज केला. त्यानंतर पाण्याचे फवारे आणि अश्रुधुराच्या नळकांड्यांचाही वापर करण्यात आला. या कारवाईत अनेक आंदोलक जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. तरीही आंदोलकांनी माघार न घेता 'संसद मार्ग' पोलीस ठाण्यापर्यंत मजल मारली. सोमवारी होणाऱ्या आंदोलनासाठी देशभरातून आलेले विद्यार्थी आणि कार्यकर्ते रविवारी रात्रीपासूनच जंतर-मंतरवर दाखल झाले होते. अनेकांनी फुटपाथवरच रात्र काढत सकाळी संसद घेरावासाठी मोर्चात सहभाग घेतला. संसदेचे अधिवेशन सुरू असल्याने या मोर्चाला कोणतीही परवानगी देण्यात आली नव्हती, असे दिल्ली पोलिसांनी स्पष्ट केले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जंतर-मंतर ते संसद मार्गावर सुमारे पाच हजार पोलीस कर्मचारी तसेच रॅपिड ॲक्शन फोर्स तैनात करण्यात आली होती. हातात तिरंगा आणि विविध मागण्यांचे फलक घेऊन आंदोलक संसदेच्या दिशेने घोषणाबाजी करत पुढे सरकत होते. 'कॉकरोच जनता पार्टी'चे प्रमुख अभिजीत दीपके यांनी, सोनम वांगचूक यांना जंतर-मंतरवर परत आणले नाही, तर संसदेकडे मोर्चा काढला जाईल, असा इशारा दिला. वांगचूक सध्या रुग्णालयात उपचार घेत आहे.

पक्षाचे प्रवक्ते सौरभ दास आणि आशुतोष रंका यांनी आंदोलनाबाबत चर्चा करण्यासाठी केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संसद परिसराला अक्षरशः छावणीचे स्वरूप प्राप्त झाले असून राजधानीत दिवसभर तणावाचे वातावरण कायम होते.

## 'कॉक्रोच जनता पार्टी' आंदोलनातील आजपर्यंतच्या ठळक घडामोडी

**आंदोलनाची सुरुवात:** नीटसह विविध स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील कथित भ्रष्टाचार आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू झाले.

**सोनम वांगचूक यांचे उपोषण:** - ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांनी जंतर-मंतर येथे बेमुदत उपोषण सुरू केले. त्यांच्या उपोषणाला देशभरातील विद्यार्थी आणि युवकांचा मोठा पाठिंबा मिळाला.

**जंतर-मंतर आंदोलनाचा विस्तार:** - आंदोलनात हजारो विद्यार्थी सहभागी झाले. सोशल मीडियावरही या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळत गेला.

**सोनम वांगचूक रुग्णालयात:** प्रकृती खालावल्याने दिल्ली पोलिसांनी सोनम वांगचूक यांना रुग्णालयात हलवले. सीजेपीने यावर आक्षेप घेत पोलिसांच्या कारवाईवर तीव्र टीका केली.

**'चलो संसद'ची घोषणा:-** सीजेपीने संसदेकडे मोर्चा काढण्याची घोषणा केली. प्रशासनाने परवानगी नाकारली आणि मध्य दिल्लीत कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली.

**आजची मोठी घटना:-** संसद मार्चदरम्यान आंदोलक आणि पोलिसांमध्ये धुमश्चक्री झाली. आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज करत बळाचा वापर केला.

**सरकारवर दबाव वाढला:-** आंदोलनामुळे परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता, पेपरफुटी आणि युवकांच्या रोजगाराच्या प्रश्नांवर राष्ट्रीय स्तरावर मोठी चर्चा सुरू झाली असून सरकारवर दबाव वाढला आहे.

# समाजासाठी आपल्याकडील सर्वोत्तम समर्पित करा - तुकाराम मुंढे




महाराष्ट्रातील सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या जीवन कार्यावर न्यू इरा पब्लिकेशन ने तुकाराम पुस्तक प्रकाशित केले याप्रसंगी तुकाराम मुंढे प्रसिद्ध साहित्यिक रंगनाथ पठारे एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर शफिक पठाण व इतर मान्यवर दिसत आहेत.

पुणे (वृत्तसंस्था)


प्रामाणिक प्रशासन, निडर निर्णयक्षमता आणि संघर्षमय प्रवासासाठी ओळखले जाणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या जीवनावर आधारित 'तुकाराम' या प्रेरणादायी पुस्तकाचे नुकतेच पुण्यातील टिळक स्मारक मंदिर येथे उत्साहपूर्ण वातावरणात प्रकाशन करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार शफी पठाण यांनी हे पुस्तक लिहिले असून, प्रकाशनापूर्वीच एक लाखांहून अधिक प्रतींचे आगाऊ बुकिंग झाल्याने पुस्तकाबाबत वाचकांमध्ये असलेली उत्सुकता अधोरेखित झाली.

ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या सोहळ्याला राज्यभरातून आलेल्या वाचकांची मोठी गर्दी झाली होती. स्वतः आयएएस तुकाराम मुंढे यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांची उपस्थिती कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली. यावेळी बोलताना तुकाराम मुंढे यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव मांडत तरुणांना नैतिक मूल्यांवर ठाम राहण्याचा संदेश दिला. इतरांशी नव्हे, तर स्वतःच्या क्षमतेशी स्पर्धा करा. प्रामाणिकपणे आणि समाजहिताचा विचार करून काम केल्यास यश निश्चित मिळते, असे ते म्हणाले.

कार्यक्रमात तुकाराम मुंढे यांचे बंधू अशोक मुंढे यांनी त्यांच्या बालपणापासूनच्या संघर्षमय प्रवासाच्या आठवणींना उजाळा देत अनेक भावूक प्रसंग उपस्थितांसमोर मांडले. कठीण परिस्थितीतून जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिकतेच्या बळावर उभा राहिलेला तुकाराम मुंढे यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

'न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित हे पुस्तक तुकाराम मुंढे यांच्या संघर्ष, तत्त्वनिष्ठा आणि प्रशासनातील कार्यशैलीचा प्रेरणादायी दस्तऐवज मानले जात असून, विशेषतः युवकांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

## ज्येष्ठ समाजवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांना अभिवादन



पुणे (वृत्तसंस्था)

ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, 'युवक क्रांती दला'चे (युक्रांद) संस्थापक आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन झाले, ८५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना मधुमेहाचा त्रास होता आणि अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना पुण्यातील एरंडवणे येथील खासगी रुग्णालयात नेले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पुरोगामी विचारवंत होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यात ते कायम अग्रेसर असत. विधिमंडळ सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले असून आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली होती. दैनिक युवावार्ता परिवारचे डॉ. कुमार सप्तर्षी हे स्नेही आणि मार्गदर्शक होते. युवावार्ता कार्यालयास भेट देऊन त्यांनी विशेष मार्गदर्शन केले होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# कृषी तरंगचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - येथील जाधव लॉन्स येथे कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढगे लिखित पुस्तकाचे प्रकाशन विविध मान्यवरांच्या शुभहस्ते थाटामाटात संपन्न झाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे होते. मा. आ. संभाजीराव फाटके, मा. आ. पांडुरंग अभंग, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलासराव खर्ची, आयुक्त योगेशराव गोडसे, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, ज्ञानदेव पांडुळे, शब्दगंधचे संस्थापक सुनील गोसावी, रामराव पाटील भदगले, काशिनाथ अण्णा नवले व्यासपीठावर उपस्थित होते. कृषी तरंग यावर सखोल विचारमंथन झाल्यामुळे हा कार्यक्रम एक मोठा वैचारिक परिसंवाद झाला अशा भावना उमटल्या.

सुरुवातीला दिगंबर गोंधळी यांनी पोवाडा सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. कृषी क्षेत्रातील अभ्यासू व अनुभवी अनेक व्यक्ती या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. यावेळी डॉ. प्रा. समीर ढगे यांनी अतिथींचा यथोचित सन्मान केला. कृषी तरंग पुस्तकाचे लेखक कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे (माजी कुलगुरू) यांनी वस्तुस्थितीवर आधारित शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा पुस्तकात उहापोह करून उपाय दिल्याचे आवर्जून सांगितले. विशेषतः शेतकऱ्यांसाठी संरक्षण कायदा परिपूर्ण सर्वांगीण आला पाहिजे असे प्रतिपादित केले. मा.आ. संभाजीराव फाटके यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्वक विचार मांडले. कुलगुरू डॉ. विलासराव खर्चे यांनी शेतकऱ्यांसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठात अनेक चांगल्या योजना असून विद्यार्थ्यांचे कल्याणसाठी उच्च पातळीच्या विद्यार्थी योजना सुरू केल्या आहेत. संशोधनाला व शिक्षणाला चांगली दिशा देण्याचे कार्य सुरू केल्याचे प्रतिपादित केले. सध्याच्या प्राप्त स्थितीमध्ये कृषी संशोधन व शेतकऱ्यांचे कष्ट यामुळे भरघोस उत्पादन होत आहे तथापि शेतीच्या मालाला योग्य भाव मिळण्याची आग्रही मागणी मा.आ. पांडुरंग अभंग यांनी मांडली. आयुक्त यशवंत डांगे यांनी शेती संदर्भातील विधायक माहिती दिली.

याप्रसंगी वक्त्यांनी अत्यंत विधायक व रचनात्मक विचार मांडून कृषी क्षेत्रात परिवर्तनाची गरज अधोरेखित केली. या प्रसंगी ज्ञानदेव पांडुळे, रामराव पाटील भदगले,भारतीय जनसंसद चे अशोक सब्बन यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी जिल्हाधिकारी किसनराव लवांडे, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र राज्याचे कार्यवाह कॉम्रेड बाबा आरगडे, मंडल कृषी अधिकारी लक्ष्मणराव सुडके, मृदशास्त्रज्ञ डॉ.रामराव सोमवंशी, प्रा.डॉ.अनिल गर्जे, कॉ.वाबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री शर्मिला गोसावी यांनी उत्कृष्टपणे केले तर प्रकल्पाधिकारी कु. प्रिया मते यांनी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले. शब्दगंध प्रकाशन ने प्रकाशित केलेल्या या पुस्तक प्रकाशन समारंभास अनेक साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी उपस्थित होते.

# अहिल्यानगरमध्ये 30 लाखांचे एमडी ड्रग्ज् जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -सावेडी उपनगरातील मिस्किनमळा परिसरात तोफखाना पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने रविवारी (१९ जुलै) धडक कारवाई करत सुमारे ३० ते ३२ लाख रुपये किमतीचे १५० ते १६० ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) जप्त केले. या कारवाईत संशयास्पद विनाक्रमांकाच्या स्विफ्ट कारसह तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, वाहनातील अन्य दोघे संशयित पसार झाले आहेत. जिल्ह्यात एकाच कारवाईत एवढ्या मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन जप्त होण्याची ही पहिलीच मोठी घटना मानली जात असून, त्यामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

तोफखाना पोलिसांचे गुन्हे शोध पथक मिस्किनमळा परिसरात गस्त घालत असताना विनाक्रमांकाची स्विफ्ट कार संशयास्पदरीत्या फिरताना आढळली. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने वेग वाढवून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून वाहन अडविले. कारवाईची चाहूल लागताच वाहनातील दोघे जण पसार झाले. तर झिशान शौकत सय्यद, रेहान जावेद शेख आणि वसीम खलील बागवान या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यानंतर वाहनाची कसून झडती घेतली असता १५० ते १६० ग्रॅम वजनाचे मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ आढळून आला. तसेच पिस्तुलासारखे दिसणारे एक लायटर, एक एअर गन, मास्क, कटावणी आणि दरोडा टाकण्यासाठी वापरले जाणारे साहित्यही पोलिसांनी जप्त केले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तोफखाना पोलिसांनी तातडीने फॉरेन्सिक पथकाला पाचारण केले. प्राथमिक तपासणीत जप्त केलेला पदार्थ मेफेड्रोन असल्याचे स्पष्ट झाले असून, त्याची काळ्या बाजारातील किंमत सुमारे ३० ते ३२ लाख रुपये असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात वसीम खलील बागवान (वय ३८, रा. पिंजर गल्ली, चाचा मेससमोर), झिशान शौकत सय्यद (वय २७, रा. सहारा कॉलनी, मुकुंदनगर) आणि रेहान जावेद शेख (वय २४, रा. छोटी मशीद, मुकुंदनगर) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर जमीर भाई आणि एक अनोळखी इसम पसार असून, त्यांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. अमली पदार्थांचा पुरवठा कोणत्या रॅकेटमार्फत होत होता, जप्त साहित्याचा नेमका वापर कशासाठी होणार होता आणि पसार आरोपींची भूमिका काय आहे, याचा तपास तोफखाना पोलिसांकडून सुरू आहे.

# हरिश्चंद्रगडावर दरड कोसळून चार पर्यटक जखमी

## दोघांची प्रकृती गंभीर, नाशिकला हलविले



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - हरिश्चंद्रगडावर भटकंती करून परतत असताना गडाच्या मध्यभागी असलेल्या मोठ्या कपारीजवळ अचानक दगड कोसळल्याने चार पर्यटक जखमी झाल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. यामध्ये दोघांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलविण्यात आले असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी दिली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील मालाड येथे नोकरी करणारे दहा तरुण शनिवारी दुचाकींवरून हरिश्चंद्रगड परिसरात पर्यटनासाठी आले होते. रविवारी सकाळी सुमारे ११ वाजता त्यांनी पाचनई मार्गे हरिश्चंद्रगडाची चढाई केली. दिवसभर गडाची भटकंती करून सायंकाळी सुमारे चारच्या सुमारास ते परतीच्या मार्गाने खाली उतरत होते.दरम्यान, अचानक मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू झाल्याने हे सर्वजण गडाच्या मध्यभागी असलेल्या मोठ्या कपारीखाली आश्रयासाठी थांबले. त्याचवेळी वरच्या बाजूचा दगड अचानक कोसळून चार पर्यटक त्याखाली सापडले.

या दुर्घटनेत निलेश विश्वकर्मा आणि प्रकाश यादव यांच्या डोक्याला व पाठीला गंभीर दुखापत झाली, तर दिनेश शहा आणि कृष्णकुमार साहू हे किरकोळ जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी व स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ मदतकार्य सुरू करून सर्व जखमींना सुरक्षितपणे खाली आणले. त्यानंतर त्यांना राजूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर निलेश विश्वकर्मा व प्रकाश यादव यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी नाशिक येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

पावसाळ्यात हरिश्चंद्रगड परिसरात दगड कोसळण्याच्या घटना घडण्याची शक्यता वाढत असल्याने पर्यटकांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी आणि धोकादायक कपारी, कडे व दरडीच्या भागात आश्रय घेणे

# संगमनेर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

## तालुकाध्यक्षपदी अजय फटांगरे, शहराध्यक्षपदी सोमेश्वर दिवटे; कार्याध्यक्षपदी अमोल शेलकर







युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या संघटन सृजन अभियान अंतर्गत संगमनेर शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार अजय नारायण फटांगरे यांची संगमनेर तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी, सोमेश्वर सूर्यभान दिवटे यांची शहर काँग्रेस अध्यक्षपदी पुनर्नियुक्ती, तर अमोल भारत शेलकर यांची संगमनेर तालुका काँग्रेस कमिटीच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी या नियुक्त्या जाहीर केल्या.

संघटन सृजन अभियानांतर्गत प्रदेश काँग्रेसने राज्यभर निरीक्षकांमार्फत विविध जिल्ह्यांमध्ये पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला होता. त्यातून प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करून ब्लॉक अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. नवनियुक्त तालुकाध्यक्ष अजय नारायण फटांगरे हे युवक काँग्रेसपासून पक्षात सक्रिय असून त्यांनी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या सभापतीपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे सांभाळली आहे. शहराध्यक्ष म्हणून पुन्हा संधी मिळालेले सोमेश्वर सूर्यभान दिवटे हे युवक काँग्रेसच्या माध्यमातून राजकारणात सक्रिय झाले. ते सध्या संगमनेर नगर परिषदेचे नगरसेवक असून शहरातील संघटनात्मक कामात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

कार्याध्यक्षपदी निवड झालेले अमोल भारत शेलकर हे २०१० पासून काँग्रेस पक्षात कार्यरत आहेत. विविध जनआंदोलनांमधील सक्रिय सहभागामुळे त्यांची काँग्रेसचा आंदोलनशील चेहरा अशी ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे पक्षाने नव्या दमाच्या तरुण नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला असल्याचे मानले जात आहे.

या नियुक्त्यांचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी स्वागत करून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. काँग्रेसचा शाश्वत व लोकशाही आणि राज्यघटना वाचवणारा विचार अधिक प्रभावीपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ही नवी टीम जोमाने कार्य करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या नवीन पदाधिकाऱ्यांचे मा महसूल मंत्री तथा माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात मा.आ. डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, युवक काँग्रेसच्या नेत्या डॉ. जयश्रीताई थोरात, पांडुरंग पाटील घुले, रणजीतसिंह देशमुख, ड माधवराव कानवडे, शंकरराव खेमनर, सुधाकर जोशी, इंद्रजीत थोरात, संपतराव डोंगरे, बाबा ओहोळ, रामहरी कातोरे, हौशीराम सोनवणे, राजेंद्र गुंजाळ, निखिल पापडेजा, सुभाष सांगळे, हैदर आली, गौरव डोंगरे, अर्चनाताई बालोडे, सौ पद्माताई थोरात विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.




# 'मैत्र जीवांचे' : मानवतेचा शाश्वत संदेश...



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांनी पसायदानात स्वतःसाठी काहीही मागितले नाही. मला मोक्ष मिळो, भक्ती मिळो किंवा ज्ञान मिळो अशी वैयक्तिक इच्छा त्यांनी व्यक्त केली नाही. त्यांच्या विचारांची झेप संपूर्ण विश्वाच्या कल्याणापर्यंत पोहोचलेली होती. म्हणूनच त्यांनी प्रार्थना केली-

जे खळांची व्यंकटी सांडो ।
तया सत्कर्मी रती वाढो ।
भुता परस्परे पडो । मैत्र जीवांचे ।।

ही केवळ प्रार्थना नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी दिलेला जीवनाचा शाश्वत संदेश आहे. माऊलींच्या या मागण्यामागे अत्यंत व्यापक आणि दिव्य विचार आहे. दुर्जनांच्या मनातील वक्रता नष्ट व्हावी, त्यांच्या अंतःकरणात सत्कर्माची आवड निर्माण व्हावी आणि सर्व जीवांमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित व्हावेत, अशी त्यांची इच्छा होती. कारण जगातील बहुतांश दुःख हे माणसाच्या वक्र वृत्तीमुळेच निर्माण होते.

आजच्या काळात मतभेद असणे स्वाभाविक आहे; परंतु मनभेद नसावेत. संघर्षाऐवजी संवाद हवा, द्वेषाऐवजी प्रेम हवे, कटुतेऐवजी आत्मीयता हवी आणि दुराव्याऐवजी जवळीक हवी. हाच 'मैत्र जीवांचे' या एका ओळीत दडलेला संदेश आहे. या संदेशाची प्रत्यक्ष अनुभूती संतांच्या पालखी सोहळ्यात येते. वारीमध्ये संवाद आहे, संघर्ष नाही; प्रेम आहे, द्वेष नाही; समता आहे, भेदभाव नाही. वारकऱ्यांच्या अंतःकरणात 'मैत्र जीवांचे' ही भावना इतकी खोलवर रुजलेली असते की जात, धर्म, भाषा, प्रांत किंवा सामाजिक स्तर यांचे सर्व भेद विसरून ते एकमेकांना आपले मानतात.

'मैत्र जीवांचे' म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील मैत्री नव्हे, तर प्रत्येक जीवाविषयी निर्मळ, पवित्र आणि निःस्वार्थ प्रेमभावना. या सृष्टीतील प्रत्येक प्राणी, पक्षी, वृक्ष, निसर्ग आणि समस्त सजीवांशी आत्मीय नाते जोडण्याची शिकवण ज्ञानेश्वर माऊली देतात. पालखी सोहळ्यात कोणी लहान नसतो, कोणी मोठा नसतो. दहा वर्षांचे एखादे मूल विठ्ठलाचे दर्शन घेऊन आले, तरी ऐंशी वर्षांचा वारकरी त्याच्या चरणी नम्रतेने माथा टेकवतो. ही भक्तीची समता आणि आत्मीयता म्हणजेच 'मैत्र जीवांचे'. खरे मैत्र तेव्हाच फुलते, जेव्हा दोन जीव शब्दांशिवाय एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. विश्वास, आत्मीयता, सहवास आणि विचारांची देवाणघेवाण यांतून दोन हृदये जोडली जातात. हे नाते जाणिवेच्या पलीकडचे असते.

ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम महाराज यांनाही दुर्जनांच्या वक्रवृत्तीमुळे अनेक क्लेश सहन करावे लागले. म्हणूनच माऊलींनी दुर्जनांच्या परिवर्तनाची प्रार्थना केली. कारण समाज बदलायचा असेल, तर माणसाच्या मनातील वाईट प्रवृत्ती बदलणे आवश्यक आहे.

वारीमध्ये कोणतीही पूर्वओळख नसताना हजारो लोक विठ्ठलाच्या भक्तीच्या धाग्याने एकमेकांशी जोडले जातात. अठरापगड जाती, विविध भाषा आणि संस्कृतीतील लोक एका ध्येयाने चालतात. ही विश्वबंधुत्वाची भावना जगासाठी आश्चर्याचा आणि कुतूहलाचा विषय ठरली आहे.

आज पालखी सोहळ्यात काही जण संतांचे सोंग घेऊन सहभागी होतात. अशा ढोंगी वृत्तीवर संत तुकाराम महाराजांनी कठोर शब्दांत प्रहार केला आहे-

ऐसे कैसे झाले भोंदू ।
कर्म करुनी म्हणती साधू ।
अंगी लावूनिया राख ।
डोळे झाकूनही करिती पाप ।।

संतत्व हे वेशात नसून आचरणात असते. ज्यांच्या कृतीत प्रेम, सेवा, समता आणि मानवता नाही, ते 'मैत्र जीवांचे' या विचाराचे खरे वाहक होऊ शकत नाहीत. ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानातील 'मैत्र जीवांचे' ही संकल्पना आजच्या समाजासाठी अधिक आवश्यक आहे. वाढती असहिष्णुता, द्वेष, हिंसा आणि विभाजनाच्या वातावरणात माऊलींचा हा संदेश मानवतेसाठी दिशादर्शक ठरतो. जगाच्या कल्याणासाठी त्यांनी मागितलेले हे पसायदान आजही प्रत्येकाच्या जीवनात प्रेम, समता, बंधुभाव आणि विश्वकल्याणाची प्रेरणा देत राहते.

म्हणूनच आजही आपण भक्तिभावाने म्हणतो-
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भुता परस्परे पडो । मैत्र जीवांचे ।।

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# श्री यशोदेव नागरी पतसंस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पुर्ण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सहकार क्षेत्रात विश्वासार्हता, पारदर्शकता आणि सभासदाभिमुख सेवेसाठी विशेष ओळख निर्माण केलेल्या श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १९ जुलै रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीचा आलेख, आर्थिक भक्कमपणा आणि भविष्यातील विकास आराखडा सभासदांसमोर मांडण्यात आला.

संस्थापक प्रदीपभाई शाह यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली तसेच चेअरमन सीए हर्षल गुंदेचा यांच्या कुशल नेतृत्वाखाली संस्थेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सभेत सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, संस्थेच्या ठेवींनी प्रथमच १०१ कोटी ३० लाख रुपयांचा टप्पा गाठला असून, ७७ कोटी २४ लाख रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे संस्थेचा एकूण व्यवसाय १७८ कोटी ५४ लाख रुपयांवर पोहोचला आहे. याशिवाय संस्थेचा स्वनिधी १५ कोटी ८९ लाख रुपये, गुंतवणूक ४३ कोटी ७७ लाख रुपये आणि खेळते भांडवल १२४ कोटी ३५ लाख रुपये इतके झाले असून संस्थेने १ कोटी ४२ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे. आर्थिक व्यवस्थापनातील काटेकोरपणा आणि जोखमीचे प्रभावी नियोजन यामुळे संस्थेला नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात यश आले असून ६८ टक्के सीडी रेशो कायम ठेवण्यात आला आहे. मान्यवरांनी संस्थेच्या वाटचालीचा गौरव करताना सांगितले की, बदलत्या आर्थिक परिस्थितीतही सभासदांचा विश्वास अबाधित राखत संस्थेने विकासाची घोडदौड कायम ठेवली. सुरक्षित गुंतवणूक, तत्पर कर्जसेवा आणि आर्थिक शिस्त यांचा समन्वय साधत संस्था सर्वसामान्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी कार्यरत आहे. संस्थेच्या यशामध्ये व्हा. चेअरमन डॉ. अजित वखारीया, संचालक मंडळ, व्यवस्थापक, अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे.

याप्रसंगी संस्थेचे सभासद, युवा पॉलिप्रिंट ॲण्ड पॅकेजिंगचे संचालक उद्योजक आनंद हासे यांची रोटरीच्या असिस्टंट गव्हर्नरपदी निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. सुशिला किसन हासे यांनी या सन्मानाचा स्वीकार केला.

वार्षिक अहवाल, ताळेबंद तसेच नफा-तोटा पत्रकास सभेत एकमताने मंजुरी देण्यात आली. संस्थेच्या कार्यपद्धतीबाबत समाधान व्यक्त करत श्री यशोदेव पतसंस्थेकडे सहकार क्षेत्रातील आदर्श संस्था म्हणून पाहिले जात असल्याची भावना व्यक्त केली. आर्थिक सुदृढता, शून्य एनपीएची परंपरा, सामाजिक बांधिलकी आणि सभासदकेंद्री दृष्टिकोन यांच्या बळावर संस्था आगामी काळातही नवे विक्रम प्रस्थापित करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!

राजहंस

दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ

संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.

अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर

(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२

www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



संगमनेरकरांनी गौरविलेले

।।जय श्रीराम।।

सुपर शॉपी

निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक

जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर

एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्

प्रोप्रा. अशोक रा. जाधव

फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२

क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा

मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत

डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०




# उपराष्ट्रपती भवनामध्ये श्याम जाजू यांच्या पुस्तकाचे लोकार्पण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे १०० वर्षाची वाटचाल यशस्वीते कडे जात असताना विविध प्रकारची पुस्तके साहित्य व इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून प्रचार व प्रसार देशभरात होत आहे. घरोघरी पोहोचून पत्रके वितरित करून सर्व क्षेत्रातून संमेलने आयोजित करून जनतेशी संवाद साधत प्रबोधनाचे काम व्यापक प्रमाणात होत आहे.

दिल्ली येथील उपराष्ट्रपती भवनात भाजपाचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष व संगमनेरचे सुपुत्र शाम जाजू यांनी 'RSS100 एक सदी संकल्पकी' या हिंदी व इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन संपन्न झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या इतिहासात प्रथमच अशा प्रकारचे आयोजन उपराष्ट्रपती भवनात झाले. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झालेल्या प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष स्थान संरक्षणमंत्री भारत सरकार राजनाथ सिंह यांनी भूषवले. ज्येष्ठ पत्रकार, इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राचे अध्यक्ष पद्मश्री रावबहादूर राय यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. पंचायत निरंजन आखाडयाचे महामंडलेश्वर कैलाशा नंदजी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय संघचालक पवन जिंदलजी यांचे ही सानिध्य या कार्यक्रमास लाभले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षाच्या वाटचालीचा, आव्हानांचा, संकल्पाचा, आढावा या पुस्तकात घेण्यात आला आहे. देशाचे नेतृत्व करणारे यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींचाही स्वयंसेवकत्वाचा अध्याय या पुस्तकात समाविष्ट आहे. प्रभात प्रकाशनाने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे.

# महिंद्रा ट्रॅक्टर्सच्या 'पंचरत्न पुरस्कार'मध्ये साई अर्पण ट्रॅक्टर्सचा देशात तिसरा क्रमांक

## अमोल बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय स्तरावर मानाचा सन्मान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेरच्या साई अर्पण ट्रॅक्टर्सने महिंद्रा ट्रॅक्टर्सच्या प्रतिष्ठेच्या 'पंचरत्न पुरस्कार २०२६' मध्ये देशभरातील डीलर्समध्ये तृतीय क्रमांकाचा मानाचा पुरस्कार पटकावत संगमनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. गोवा येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

मागील आर्थिक वर्षात विक्री, ग्राहक सेवा, व्यवस्थापन आणि उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर साई अर्पण ट्रॅक्टर्सने राष्ट्रीय स्तरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामागे संचालक अमोल बोऱ्हाडे यांचे दूरदृष्टीचे नेतृत्व, नियोजन, ग्राहकाभिमुख सेवा आणि संपूर्ण टीमची सातत्यपूर्ण मेहनत महत्त्वाची ठरली. साई अर्पण ट्रॅक्टर्सने महिंद्राच्या आधुनिक तंत्रज्ञानयुक्त ट्रॅक्टर्ससह शेतकऱ्यांना दर्जेदार विक्रीपश्चात सेवा, विश्वासार्ह सुविधा आणि त्वरित ग्राहक सहाय्य उपलब्ध करून देत अल्पावधीतच विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. याच ग्राहककेंद्री कार्यपद्धतीची दखल घेत महिंद्रा ट्रॅक्टर्सने हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला.

पुरस्कार वितरण सोहळ्यास महिंद्रा ट्रॅक्टर्सचे प्रेसिडेंट विजय राम नाकरा, सीईओ हर्ष के. राय, नॅशनल सेल्स हेड परीक्षित घोष, झोनल हेड जुझार विर्क, महाराष्ट्र स्टेट हेड स्वप्नील जोशी, एरिया मॅनेजर अमरनाथ गुरुबट्टी तसेच टेरिटरी मॅनेजर सुनील शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते साईअर्पण ट्रॅक्टर्सचा गौरव करण्यात आला.

या यशाबद्दल अमोल बोऱ्हाडे यांनी महिंद्रा कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, ग्राहकांचा विश्वास आणि कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाचे श्रेय दिले. भविष्यातही शेतकऱ्यांना अधिक दर्जेदार सेवा देत उत्कृष्टतेची परंपरा कायम राखण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

देशभरातील महिंद्रा ट्रॅक्टर्सच्या डीलर्समध्ये तिसरा क्रमांक मिळविण्याची ही कामगिरी संगमनेरसाठी अभिमानाची बाब मानली जात असून, साईअर्पण ट्रॅक्टर्सच्या या राष्ट्रीय यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धेत विघ्नेशा आहेरची गुणवत्ता यादीत निवड

संगमनेर, प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित बालचित्रकला स्पर्धा-२०२५ मध्ये चंदनापुरी येथील चंदनेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. विघ्नेशाराजे किशोर आहेर (इयत्ता सहावी) हिने राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मंडळाने जाहीर केलेल्या निकालानुसार गट क्र. ३ (इयत्ता पाचवी ते सातवी) मध्ये तिची राज्यस्तरीय गुणवत्ता प्रमाणपत्र व पारितोषिकासाठी निवड झाली आहे.

चित्रकलेतील कल्पकता, सातत्यपूर्ण सराव आणि प्रभावी कलात्मक सादरीकरणाच्या बळावर विघ्नेशाराजेने हे यश मिळविले आहे. तिच्या या यशामुळे विद्यालयासह चंदनापुरी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विद्यार्थिनीच्या या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य ए. सी. खेमनर,



उपमुख्याध्यापक एस. एम. राहणे, पर्यवेक्षिका श्रीमती हांडे, मार्गदर्शक कलाशिक्षक बी. एम. रावताळे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे कौतुक करून भविष्यात राष्ट्रीय स्तरावरही यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या यशामुळे चंदनेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातील गुणवत्तेला आणखी एक मानाचा तुरा लाभला असून इतर विद्यार्थ्यांनाही चित्रकलेच्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास जनता शिक्षण प्रसारक मंडळ, चंदनापुरीचे रजिस्ट्रार तथा माजी प्राचार्य एम. एम. फटांगरे यांनी व्यक्त केला. संस्थेचे अध्यक्ष आनंदराव कढणे, उपाध्यक्ष व्ही. बी. कढणे, सचिव रामदास राहाणे, खजिनदार अशोकराव राहाणे, सदस्य अनिलराव कढणे व नरेंद्र राहाणे, तसेच गावचे सरपंच, उपसरपंच, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी विघ्नेशाराजेचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

## भक्ती, ज्ञान आणि स्त्रीशक्तीचे तेजस्वी प्रतीक - संत वेणाबाई

वेणाबाईचा भाव थोर।
सद्गुरू चरणी निरंत।।

महाराष्ट्राच्या संत परंपरेतील दोन मोठे प्रवाह म्हणजे वारकरी आणि रामदासी. या दोन्हींचा संगम म्हणजे संत वेणाबाई. समर्थ रामदास स्वामींच्या प्रमुख स्त्री शिष्या म्हणून त्यांनी १७ व्या शतकात भक्ती आणि समाज दोन्ही क्षेत्रात क्रांती घडवली.





**जन्म आणि प्रारंभिक जीवन**

संत वेणाबाईंचा जन्म इ.स. १६२७ च्या सुमारास कोल्हापूर येथील देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. वडिलांचे नाव आदिनाथ गोसावी. महालक्ष्मीच्या छायेत त्यांचे बालपण गेले. त्या बुद्धिमान आणि सुसंस्कृत होत्या. त्या काळच्या रिवाजानुसार वयाच्या ११ व्या वर्षी मिरज येथे त्यांचा विवाह झाला. परंतु दुर्दैवाने एका वर्षातच पतीचे निधन झाले. अवघ्या १२ व्या वर्षी त्या विधवा झाल्या.

त्या काळात विधवेचे जीवन अत्यंत कठोर होते. केसवपन, रंगीत वस्त्र निषेध, सामाजिक बहिष्कार या सर्वातून त्यांना जावे लागले. तरीही त्यांनी खचून न जाता अध्यात्माचा मार्ग स्वीकारला.

**समर्थ शिष्यत्व आणि आध्यात्मिक प्रगती**

त्याच काळात समर्थ रामदास स्वामींचे कोल्हापूर-मिरज भागात आगमन झाले. त्यांचे कीर्तन आणि दासबोधाचे निरूपण ऐकून वेणाबाईंच्या मनात मोक्षाची ओढ निर्माण झाली. त्यांनी समर्थांना शरण जाऊन दीक्षा मागितली. समर्थांनी त्यांच्यातील तेज ओळखून राममंत्र दिला.

समर्थांच्या सान्निध्यात वेणाबाईंनी वेद, उपनिषदे, ज्ञानेश्वरी आणि रामायणाचा अभ्यास केला. अल्पावधीतच त्या समर्थांच्या सर्वात विश्वासू शिष्या बनल्या. कर्मठ समाजाने याला विरोध केला. विधवा स्त्री मठात राहते अशी टीका झाली. नातेवाईकांनीही त्यांना नावे ठेवली. या काळात एक प्रसंग घडला. काही नातेवाईकांनी त्यांना संपवण्यासाठी जेवणात विष मिसळले. वेणाबाईंनी श्रीरामाचे नाव घेत ते प्राशन केले. विषाचा परिणाम न होता त्यांच्यातून दैवी तेज प्रकटले. हा प्रसंग पाहून विरोधकांनीही त्यांचे श्रेष्ठत्व मान्य केले.

**कीर्तनकार आणि क्रांतीकारिणी**

समर्थांनी वेणाबाईंना कीर्तनाचा अधिकार दिला. त्या हातात टाळ-मृदंग घेऊन शेकडो पुरुषांच्या सभेत रामकथा सांगणाऱ्या पहिल्या महिला कीर्तनकार ठरल्या. सज्जनगडावर एकदा त्या सीता स्वयंवर वर कीर्तन करत असताना, त्यांच्या भक्तीच्या आवेगाने श्रीरामाची पाषाण मूर्तीही डोलू लागली असे सांगितले जाते. हा प्रसंग भक्तीच्या सामर्थ्याचे प्रतीक बनला.

समर्थांनी चाफळ मठ आणि सज्जनगडावरील व्यवस्थेची जबाबदारीही त्यांच्यावर सोपवली. शिष्यांना शिकवणे, महाप्रसाद पाहणे आणि नित्य कीर्तन करणे हा त्यांचा दिनक्रम होता. जेव्हा स्त्रियांच्या मठप्रवेशावर प्रश्न उपस्थित झाले, तेव्हा समर्थ म्हणत, भक्तीला स्त्री-पुरुष भेद नाही. वेणा ही भक्तीचे मूर्तिमंत रूप आहे.

**साहित्यसेवा**

वेणाबाई केवळ कीर्तनकार नव्हत्या तर श्रेष्ठ कवयित्रीही होत्या. त्यांचा सीता स्वयंवर हा ग्रंथ मराठी साहित्यात मोलाचा आहे. त्यात त्यांनी स्त्रीच्या नजरेतून सीतेचे मन, विवाह आणि रामभक्ती मांडली आहे. याशिवाय त्यांनी अनेक अभंग, भूपाळ्या आणि पदे रचली. त्यांच्या अभंगात गुरुभक्ती आणि विठ्ठल-रामाचे अद्वैत दिसते.

**त्यांचा एक प्रसिद्ध अभंगः**

**सद्गुरूरायाचे चरण वंदावे।**
**मनाचे उन्मन तेथे व्हावे।।**
**रामनाम मुखी गाता रात्रंदिन।**
**वेणा म्हणे मिटले संसाराचे ऋण।।**

वैधव्याचे दुःख बाजूला ठेवून त्यांनी आत्मानंदाचे शिखर गाठले, याची प्रचिती त्यांच्या रचनेतून येते.


**महानिर्वाण आणि वारसा**

इ.स. १६७८ मध्ये वयाच्या ५१ व्या वर्षी सज्जनगडावर रामनवमीच्या दिवशी कीर्तन करत असतानाच त्यांना आपला शेवटचा क्षण कळला. त्यांनी समर्थांच्या चरणी मस्तक ठेवले, भक्तांचा निरोप घेतला आणि राम-विठ्ठल नामात प्राण सोडले. समर्थांनी स्वतः त्यांचे अंत्यसंस्कार केले. आज सज्जनगडावर त्यांचे पवित्र समाधी मंदिर आहे.

**आजच्या काळासाठी संदेश**

संत वेणाबाईंचे जीवन २१ व्या शतकातील स्त्रियांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी दाखवून दिले की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी गुरुभक्ती, ज्ञान आणि कर्तृत्वाने समाजाला नवी दिशा देता येते. ज्या काळात स्त्रीला घराबाहेर बोलण्याची मुभा नव्हती, त्या काळात त्यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून धर्म, नीती आणि भक्तीचा प्रसार केला.

वारकरी आणि रामदासी परंपरेचा सेतू असलेल्या वेणाबाई आजही भक्ती, त्याग आणि धैर्याचे प्रतीक आहेत. त्यांचे चरित्र आपल्याला शिकवते की खरे तेज हे अंगावरच्या वस्त्रात नाही तर मनातील निष्ठेत आणि कर्मातील पावित्र्यात असते.



**संकलन, संतचरणरज...**

**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**

(पुणे युवावार्ता, प्रतिनिधी), मो . ८६६८३२७१७४

सौजन्य - निजध्यास...

# जादा दराने खत विक्री करणाऱ्यांना पाठीशी घालणार नाही - ना. विखे पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- पुराव्यांसह लेखी तक्रारी आल्यास कोणालाही पाठीशी न घालता जादा दराने खतांची विक्री करणाऱ्या दुकानांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. साकूरच्या उपसा सिंचन योजना व भोजापूर चारीच्या कामासाठी निधीच्या प्रस्तावास तातडीने मंजुरी देणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

संगमनेर तालुक्यातील खरीप हंगाम व टंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी आमदार अमोल खताळ, प्रांताधिकारी अरुण उंडे, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तहसीलदार धीरज मांजरे, वीज वितरण कंपनीचे प्रदीप वट्टमवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीनिवास वर्पे, जलसंपदा विभागाचे प्रदीप हापसे, अमोल कवडे, जलसंधारण विभागाचे अभियंता गायसमुद्रे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तालुक्यातील जलजीवन योजनेच्या कार्यपद्धतीबाबत मोठ्या प्रमाणात प्राप्त तक्रारींवर श्री. विखे पाटील म्हणाले की, योजनेच्या कामावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. ज्या गावांत मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्या आहेत, तेथे विभागाचे व स्वतंत्र यंत्रणेतील अधिकारी पाठवून कामाचे परीक्षण करून अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जलजीवन योजनेच्या कामात अनेक गावांत योजनेचे पाईप न टाकताच बिले काढण्यात आल्याची बाब अतिशय गंभीर असून, घुलेवाडी गावच्या पाणीपुरवठा योजनेबाबतही ग्रामस्थांनी बैठकीत मंत्री विखे पाटील यांच्याकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी केल्या.

तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे तालुक्यातील शेतकरी विमा योजनेपासून वंचित राहिले. त्यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याबाबत उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी यांनी गांभीर्याने दखल घ्यावी, असे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. तालुक्यात खतांचे लिंकिंग होत असल्यास शेतकऱ्यांकडून पुराव्यांसह लेखी तक्रारी मागवून घ्याव्यात. कोणालाही पाठीशी न घालता जादा दराने खतांची विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्याचेही त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाच्या माध्यमातून पाण्याचे चांगले नियोजन झाल्यामुळे निळवंडे व प्रवरा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाण्याची समस्या जाणवली नाही. निळवंडे धरणातून आठ आवर्तने सोडून २४० बंधारे भरले आहेत. साकूर भागातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून, या योजनेच्या कामाचा सुमारे १०० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. भोजापूर प्रकल्पाचा वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पात समावेश करण्यात आला असून, या योजनेतूनच निधी उपलब्ध होणार आहे.

आ.अमोल खताळ म्हणाले, पूर्वीपेक्षा आता ग्रामीण व शहरी भागात विकासकामे मार्गी लागण्याचे प्रमाण वाढले आहे. अधिकाऱ्यांचेही चांगले सहकार्य मिळत असल्याने शासनाच्या माध्यमातून विविध कामे होत आहेत. ज्या गावांत पाण्याची टंचाई आहे, त्या ठिकाणी टँकर उपलब्ध करून देण्यासाठी आपण सूचना देत असतो.

# गुरुपौर्णिमेनिमित्त साई मंदिरात सात दिवसीय धार्मिक सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज ट्रस्ट व्यवस्थापक मंडळाच्या वतीने प्रवरा म्हाळुंगी संगमावर वसलेल्या साई मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२२ जुलैपासून सुरू होणाऱ्या या उत्सवात पारायण, साई भजन संध्या, संत भेट पालखी, महाप्रसाद, लघु रुद्राभिषेक आदी कार्यक्रम होणार असून संगमनेर शहर व तालुक्यातील साई भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन व्यवस्थापनाने केले आहे. २२ जुलै रोजी सकाळी सिंहासन संकल्प पूर्णत्व सोहळा व सामुदायिक श्रीसाई सच्चरित्र पारायण संकल्प करण्यात येणार आहे. त्याच दिवशी रात्री ८ ते १० या वेळेत साई मंदिराच्या पाठीमागील प्रांगणात 'साई भजन संध्या' संपन्न होणार आहे.

गुरुपौर्णिमेच्या मुख्य दिवशी २९ जुलै रोजी पहाटे श्री साईनाथ महाराजांचा लघु रुद्राभिषेक होईल. सकाळी आरतीनंतर संत भेट पालखी सोहळा निघणार असून महालक्ष्मी माता, संतोषी माता, श्री संत गजानन महाराज तसेच श्री स्वामी समर्थ मंदिर येथे पालखी जाईल. यावेळी श्री साईबाबांनी स्वतः परिधान केलेला शेला भाविकांच्या दर्शनासाठी पालखीत ठेवण्यात येणार आहे.


तसेच सकाळी पारायण करणाऱ्या भाविकांचा सत्कार, नवीन पारायणकर्त्यांना श्रींची प्रतिमा व श्री साई सच्चरित्र प्रसादरूपाने भेट, दुपारी १२ वाजता मध्याह्न आरती नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

पारायणासाठी इच्छुक भाविकांनी आपली नावे मंदिरात नोंदवावीत, असे आवाहन व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष जसपाल डंग यांनी केले आहे.

याशिवाय गुरुपौर्णिमेनंतर येणाऱ्या एकादशीला संगमनेर ते शिर्डी ओम साई दिंडी पायी सोहळ्याचेही आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

# विशेष संपादकीय...

## श्रद्धांजली...



## डॉ. कुमार सप्तर्षी

### वैचारिक संघर्षाचा एक तेजस्वी पर्व अनंतात विलीन

**युक्रांदचे डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन म्हणजे महाराष्ट्राला झालेली वेदना आहे. सहिष्णू आणि समाजवादी विचारांनी येणाऱ्या प्रश्नांना तोंड देत आणि सत्याग्रही विचाराने वाटचाल करणारे डॉ. कुमार सप्तर्षी हे हजारो युवकांचे स्मृतिस्थान होते. दैनिक युवावार्ता परिवाराचे स्नेही म्हणून त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत असायचे. त्यांच्या प्रती कृतज्ञता म्हणून त्यांच्या कार्यास अभिवादन म्हणून दैनिक युवावार्ता त्यांच्या स्मृतींना सक्रियतेने उजाळा देत आहे.**

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक पटलावर तब्बल सहा दशकांहून अधिक काळ आपल्या निर्भीड विचारांनी आणि आक्रमक चळवळींनी प्रभाव पाडणारे ज्येष्ठ गांधीवादी, समाजवादी विचारवंत आणि 'युवक क्रांती दल' (युक्रांद) चे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांचे नुकतेच वयाच्या ८५ व्या वर्षी पुण्यात निधन झाले. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील पुरोगामी आणि लोकशाही मूल्यांसाठी लढणारा एक बुलंद आणि हक्काचा आवाज कायमचा शांत झाला आहे.डॉ. सप्तर्षी मला अगदी लहान भावासारखा जीव लावायचे. जेव्हा जेव्हा आमची भेट व्हायची, तेव्हा तेव्हा ते अत्यंत आदराने माझी आणि माझ्या संपूर्ण कुटुंबाची विचारपूस करायचे. आमची ही मैत्री गेली ४० वर्षांहून अधिक काळ अगदी निखळ आणि अबाधित राहिली. माझ्या घरावर त्यांचा इतका हक्क होता की, ते अगदी हक्काने आणि हसतमुखाने आमच्या घरी यायचे. माझ्या वैयक्तिक आयुष्याच्या आणि विचारांच्या जडणघडणीत डॉ. कुमार सप्तर्षी यांचे स्थान अत्यंत मोलाचे राहिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाने माझ्या जीवनप्रवासाला एक प्रगल्भ दिशा दिली. त्यांचे जाणे/त्यांच्या आठवणी आमच्या कुटुंबासाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या आहेत. वैद्यकीय पेशा स्वीकारून सुखासीन आयुष्य जगणे सहज शक्य असताना, समाजातील वंचित आणि शोषितांच्या हक्कासाठी आयुष्य पणाला लावणारा एक झुंजार सत्याग्रही म्हणून डॉ. कुमार सप्तर्षी यांची ओळख नेहमीच अग्रस्थानी राहील. २१ ऑगस्ट १९३९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील खेड येथे जन्मलेल्या कुमार सप्तर्षी यांचे प्राथमिक संस्कार राष्ट्रसेवा दलात झाले. पुढे पुण्यात बी.एस्सी. आणि त्यानंतर एम.बी.बी.एस. (चइइड) चे शिक्षण घेत असतानाच त्यांच्या आयुष्याला एक नवे वळण मिळाले. प्रख्यात अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते निळू फुले यांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांची समाजवादाशी ओळख झाली. निळूभाऊंनी दिलेल्या पुस्तकांमुळे आणि त्यांच्यामुळेच झालेल्या डॉ. राममनोहर लोहिया यांच्या भेटीमुळे कुमार सप्तर्षी यांनी वैद्यकीय प्रॅक्टिस बाजूला सारून स्वतःला पूर्णवेळ समाजकार्यात झोकून दिले. १९६७ मध्ये त्यांनी स्थापन केलेले 'युवक क्रांती दल' (युक्रांद) हे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातील एक मैलाचा दगड ठरले. तरुणांना संघटित करून, त्यांच्यात वैचारिक प्रगल्भता निर्माण करून सामाजिक परिवर्तन घडवून आणणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता. महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीला, दलित-बहुजनांच्या हक्कांच्या लढ्याला आणि सामाजिक समतेच्या विचाराला युक्रांदने मोठी ताकद दिली. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणांची वैचारिक फळी तयार केली, जी आजही महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांत कार्यरत आहे. १९७५ च्या आणीबाणीच्या काळात लोकशाही रक्षणासाठी डॉ. कुमार सप्तर्षी यांनी दिलेला लढा अत्यंत महत्त्वाचा होता. सुरुवातीला भूमिगत राहून काम केल्यानंतर, २ ऑक्टोबर १९७५ रोजी त्यांना अटक झाली आणि तब्बल १६ महिने त्यांनी येरवडा कारागृहात 'मिसा' अंतर्गत काढले. जयप्रकाश नारायण यांच्या प्रेरणेने त्यांनी जनता पक्षात प्रवेश केला आणि १९७८ मध्ये ते अहमदनगर शहरातून आमदार म्हणून विधानसभेवर निवडून गेले. आमदार म्हणून काम करताना त्यांनी सभागृहात नेहमीच सामान्यांचे प्रश्न हिरीरीने मांडले. मात्र, नंतरच्या काळात सत्तेच्या राजकारणापेक्षा त्यांना समाजकारणाचे आणि वैचारिक जागृतीचे व्यासपीठ अधिक भावले. डॉ. कुमार सप्तर्षी हे महात्मा गांधी आणि डॉ. राममनोहर लोहिया यांच्या विचारांचे खरे पाईक होते. अन्यायविरुद्ध आवाज उठवताना त्यांनी कधीही तडजोड केली नाही. दलित बांधवांच्या मंदिर प्रवेशाचे आंदोलन असो, किंवा लोकशाही मूल्यांची जपणूक, आपल्या संपूर्ण आयुष्यात विविध आंदोलनांमुळे त्यांना तब्बल ६२ वेळा अटक झाली होती. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी महाराष्ट्र गांधी स्मारक निधी'चे अध्यक्ष म्हणून अत्यंत मोलाचे काम केले. गांधीजींचे विचार नव्या पिढीपर्यंत, विशेषतः तरुणांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी व्याख्याने आणि शिबिरांचे आयोजन केले. ते केवळ एक उत्तम वक्ता आणि आंदोलक नव्हते, तर एक सिद्धहस्त लेखकही होते. 'सत्याग्रही' मासिकाच्या माध्यमातून त्यांनी अनेक वर्षे महाराष्ट्राला वैचारिक खाद्य पुरवले. 'आम्ही विद्यार्थी आणि आमच्या दंगली', 'येरवडा विद्यापीठातील दिवस', 'धर्माबद्दल', 'सत्ताबदलाची दोन वर्षे' यांसारख्या त्यांच्या अनेक पुस्तकांनी वाचकांच्या मनावर आणि विचारांवर खोल ठसा उमटवला. डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाने महाराष्ट्राने केवळ एक माजी आमदार किंवा विचारवंत गमावलेला नाही, तर समाजहितासाठी आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असणारा एक 'वैचारिक पहारेकरी' गमावला आहे. आज जेव्हा देशात आणि राज्यात वैचारिक ध्रुवीकरण वाढत आहे, अशा काळात त्यांच्यासारख्या संयमी, अभ्यासू आणि तितक्याच रोकठोक नेत्याची उणीव महाराष्ट्राला सदैव भासत राहील. त्यांच्या स्मृतीस आणि सामाजिक योगदानास विनम्र अभिवादन!

## आषाढी एकादशी निमित्त...

### श्री ज्ञानेश्वरी प्रवचन

**प्रसिद्ध ज्ञानेश्वरी निरूपणकार**

**आचार्य ह.भ.प. अरुण महाराज फरगडे**



**बुधवार दि. २२ जुलै २०२६ सायं. ६.०० वाजता**
**ठिकाण – श्री ज्ञानेश्वर मंदिर, चंद्रशेखर चौक, संगमनेर**

**निमंत्रक – रमेश काका सराफ व परिवार**

## जाहिर नोटीस

तमाम नागरिकांना कळविण्यात येत आहे की, खरेदी घेणार - उसामा रियाज बेग रा. एकता नगर, संगमनेर हे खरेदी देणार - शौकत अब्दुल बेग रा. कुरण ता. संगमनेर जिल्हा अहिल्यानगर यांचे क्षेत्र सर्वे नंबर १८७/ १५/ १/६, २०० चौरस फूट (दोन गुंठे) क्षेत्र खरेदी शासकीय नियमानुसार घेत असून याबाबत कोणास काही हरकत असेल तर संबंधितांनी पुढील आठ दिवसात लेखी पुराव्यासह हरकत नोंदवावी. त्यानंतर कोणतीही हरकत आल्यास ग्राह्य धरली जाणार नाही.

**संपर्क - उसामा रियाज बेग**
**संगमनेर, मो. ८८८८१०३९८४**

**SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL**
**Daily Yuvavarta**

## पाहिजेत

**शेतीच्या कामासाठी जोडपे पाहिजे**
राहाण्याची उत्तम सोय
एकरूखे ता. रहाता, जि. अहिल्यानगर
– संपर्क –
**7559321755**

तहसिल कार्यालय, संगमनेर
क्रं.कावि/दंडाधि/वारस/२०२६
दिनांक – १५/०७/२०२६

**तमाम लोकांस कळविण्यात येते की,**
**कै. नंदकिशोर छगनलाल ओझा, रा. संगमनेर, ता. संगमनेर** हे दिनांक १०/०५/२०२६ रोजी मौजे संगमनेर या ठिकाणी मयत झालेले असुन ते संगमनेर नगरपरिषद संगमनेर, ता. संगमनेर येथे कामगार या पदावर सेवानिवृत्ती वेतनधारक होते त्यांना वारस खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | शोभा नंदकिशोर ओझा | ७० वर्ष | पत्नी |
| २. | आशिष नंदकिशोर ओझा | ४४ वर्ष | मुलगा |
| ३. | अमित नंदकिशोर ओझा | ४० वर्ष | मुलगा |
| ४. | सारिका देविल जोशी | ४६ वर्ष | मुलगी |
| ५. | राधिका महेश ओझा | ४२ वर्ष | मुलगी |

वरील प्रमाणे मयतास वारस असून या व्यतिरिक्त मयतास दुसरे कोणीही वारस नाहीत. या वारसपत्राबाबत कोणास काही हरकत तक्रार घ्यावयाची असल्यास ती आज पासुन कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावी. तक्रार न आल्यास **श्रीमती. शोभा नंदकिशोर ओझा, रा. संगमनेर, ता.संगमनेर जि. अहिल्यानगर** यांना वारसाचा दाखला (हिअरशिप सर्टिफिकेट) प्रदान करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस यास **श्रीमती. शोभा नंदकिशोर ओझा, रा. संगमनेर ता.संगमनेर जि.अहिल्यानगर** यांचे अर्जावरुन दिली असे.

**तहसिलदार, संगमनेर**

# गांधीवादी विचारांचा दीपस्तंभ हरपला

## माजी मंत्री थोरात, माजी आ. डॉ. तांबे यांच्यांकडून डॉ. कुमार सप्तर्षींना श्रद्धांजली



संगमनेर - ज्येष्ठ विचारवंत, गांधीवादी तत्त्वांचे अखंड पुरस्कर्ते आणि सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्यभर झटणारे डॉ.कुमार सप्तर्षी यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या निधनाने गांधीवादी विचारांचा निष्ठावंत दीपस्तंभ हरपले असल्याची भावना काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली आहे तर गांधीवादी विचारांचा पाईक हरपला असल्याची भावना माजी आमदार डॉ.सुधीर तांबे यांनी व्यक्त केली आहे.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की , 'युक्रांद'च्या माध्यमातून त्यांनी असंख्य तरुणांच्या मनात वैज्ञानिक दृष्टीकोन, सामाजिक भान आणि अन्याय - अंधश्रद्धेविरुद्ध लढण्याची प्रेरणा जागवली. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीला नवी दिशा दिली. त्यांच्या जाण्याने समाजमनाला विचारांची दिशा देणारा एक संवेदनशील, अभ्यासू आणि निर्भीड आवाज कायमचा हरपला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना तसेच युक्रांद परिवाराला हे दुःख सहन करण्याचे बळ प्रदान करो ही प्रार्थना. लोकशाही सामाजिक न्याय आणि जनजागृती साठी आपले आयुष्य समर्पित करणारे अहिल्यानगर जिल्ह्याचे सुपुत्र जेष्ठ विचारवंत डॉक्टर कुमार सप्तर्षी हे गांधीवादी विचारांचे पाईक होते त्यांच्या निधनाने आपले सामाजिक कार्यातील जेष्ठ मार्गदर्शक हरपले असल्याची भावना जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी व्यक्त केली आहे.डॉक्टर कुमार सप्तर्षी यांना अभिवादन करताना माजी आमदार डॉक्टर सुधीर तांबे यांनी म्हटले आहे की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा समतेचा विचार पुढे नेण्यासाठी डॉक्टर कुमार सप्तर्षी यांनी आयुष्यभर काम केले. युवक क्रांती दलाचे ते संस्थापक अध्यक्ष होते महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी मोठे योगदान दिले. माझ्या वैयक्तिक आयुष्यात त्यांचे स्थान अत्यंत मोलाचे आहे त्यांनी वेळोवेळी मला मार्गदर्शन केले.

कुमार सप्तर्षी यांचे शालेय शिक्षण अहिल्यानगर मध्ये झाले. सत्याग्रही विचारधारा या त्यांच्या मासिकाने सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांची दिलीप ३५ वर्ष वैचारिक बांधणी केली. पुणे येथील गांधी भवनाची वास्तू जागा वाचवण्यात त्यांचे मोलाचे योगदान राहिले युवक क्रांती दलाच्या माध्यमातून त्यांनी राज्यभर हजारो विद्यार्थी घडवले ते परिवर्तनवादी समाजवादी चळवळीचा आधारवड होते समाजातील विषमता, अन्याय आणि अंधश्रद्धे विरुद्ध संघर्ष करण्यासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या तत्त्वांवर लोकनेते बाळासाहेब थोरात व आपण कायम पुरोगामी विचार आणि वारकरी संप्रदायाचा समतेचा आणि मानवतेचा विचार जपला. हा विचार माझ्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाचा असून डॉक्टर कुमार सप्तर्षी यांचे मोलाचे स्थान होते. ज्या विचारांसाठी त्यांनी आयुष्यभर काम केले तो विचार पुढे घेऊन जाणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरणार असल्याचे जय हिंद लोक चळवळीचे संस्थापक पुरोगामी विचारांचे पाईक माजी आमदार डॉ.सुधीर तांबे यांनी म्हटले आहे.

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
०२४२५ २२५१२९

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
SHAHIN A KARIM SHAIKH
**NEW NAME AS**
SHAHIN MOHSIN BAGWAN
ADD - NAVGHAR GALLI , BAGWAN PURA , SANGAMNER
TAL - SANGAMNER
DIST- AHMEDNAGAR

## पाहिजेत

**अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत**
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
**9822523424**

## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. योगेंद्र पिशोरीलाल सचदेव पेटकर रा. जाणता राजा रोड, संगमनेर. म्यु.घ.नं. -, सि. स. नं. - स.नं. १५१/१७५ या ठिकाणी मध्ये सचदेव क्लिनिक चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २०/०७/२०२६ **मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

## पाहिजेत

**नामांकित व्हॅल्युएशन फर्ममध्ये पुरूष पाहिजेत**
**पुरुष- 02 जागा**
इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा
**9860565356**

## पाहिजेत

**घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे**
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
**9822304638**

## पाहिजेत

**राजवीर फार्मा**
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आर्कषक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
**8669184141**

## फ्लॅट विकणे आहे

**2 BHK फ्लॅट विकणे आहे नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह**
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
**8788945208**
**8208223721**

## पाहिजेत

**आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.**
हेल्पर – ०२
ड्रायव्हर – ०१
सेल्समन – ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
**9922113534**
**9730468090**

## पाहिजेत

**जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी**
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
**7588249849**






## दिनविशेष

२०२२: द्रौपदी मुर्मू — यांची भारताच्या १५व्या राष्ट्राध्यक्षा म्हणून निवड.
२०१२: एर्डन एरुस — यांनी जगातील पहिली एकट्याने मानव-शक्ती प्रदक्षिणा पूर्ण केली.
२००८: राम बरन यादव — यांना नेपाळचे पहिले राष्ट्रपती घोषित करण्यात आले.
२००२: वर्ल्ड कॉम — कंपनीने दिवाळखोरी घोषित केली.
१९८३: अंटार्क्टिका — खंडातील व्होस्टॉक येथे उणे ८९.२ सेल्सियस यापृथ्वीवरील सर्वात नीचांकी तापमानाची नोंद केली गेली.
१९७७: लिबिया-इजिप्शियन युद्ध — सुरुवात.
१९७०: अस्वान हाय धरण, इजिप्त — हे जगातील सर्वात मोठे बंधारा धरण ११ वर्षांच्या बांधकामानंतर पूर्ण झाले.
१९६१: मर्क्युरी-रेडस्टोन ४ मिशन — गुस ग्रिसम हे अंतराळात जाणारे दुसरे अमेरिकन बनले.
१९६१: अमेरिकन नागरिकी युद्ध — बुल रनची पहिली लढाई: युद्धाची पहिली मोठी लढाई

## जन्म

१९६८: आदित्य श्रीवास्तव — भारतीय अभिनेते
१९६०: अमर सिंग चमकिला — भारतीय गायक-गीतकार (निधन: ८ मार्च १९८८ )
१९४७: चेतन प्रतापसिंग चौहान — भारतीय क्रिकेटपटू, उत्तर प्रदेशचे आमदार (निधन: १६ ऑगस्ट २०२० )
१९४५: बॅरी रिचर्ड्स — दक्षिण आफ्रिकेचे क्रिकेट खेळाडू
१९३४: चंदू बोर्डे — भारतीय क्रिकेटपटू आणि निवड समितीचे अध्यक्ष — पद्म भूषण, पद्मश्री, अर्जुना पुरस्कार
१९३०: रा. चिं. ढेरे — भारतीय संस्कृतीचे अभ्यासक संशोधक
१९२०: आनंद बक्षी — प्रसिद्ध भारतीय कवी आणि गीतकार (निधन: ३० मार्च २००२ )
१९११: उमाशंकर जोशी — भारतीय लेखक, कवी आणि विद्वान — ज्ञानपीठ पुरस्कार (निधन: १९ डिसेंबर १९८८ )
१९१०: वि. स. पागे — स्वातंत्र्यसैनिक, रोजगार हमी योजनेचे जनक
१८९९: अर्नेस्ट हेमिंग्वे — अमेरिकन लेखक — नोबेल पुरस्कार (निधन: २ जुलै १९६१ )

## मृत्यू

२०२०: लालजी टंडन — मध्य प्रदेशचे २२वे राज्यपाल (जन्म: १२ एप्रिल १९३५ )
२०१३: लूरेम्बॅम ब्रजेशोतोरी देवी — भारतीय मार्शल आर्टिस्ट (जन्म: १ जानेवारी १९८१ )
२००९: गंगूबाई हनगळ — किराणा घराण्याच्या शास्त्रीय गायिका — पद्म विभूषण, पद्म भूषण (जन्म: ५ मार्च १९१३ )
२००२: गोपाळराव बळवंतराव कांबळे — मराठी चित्रकार
२००१: शिवाजी गणेशन — दाक्षिणात्य अभिनेते (जन्म: १ ऑक्टोबर १९२८ )
१९९८: ॲलन शेपर्ड — अमेरिकन अंतराळवीर
१९९७: राजा राजवाडे — साहित्यिक (जन्म: १ जानेवारी १९३६ )
१९९५: सज्जाद हुसेन — संगीतकार मेंडोलीनवादक (जन्म: १५ जून १९१७ )
१९९४: डॉ. र. वि. हेरवाडकर — मराठी बखर वाङ्मयाचे अभ्यासक




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**21 जुलै**

## द्रौपदी मुर्मूंची भारताच्या १५व्या राष्ट्राध्यक्षा म्हणून ऐतिहासिक निवड



२१ जुलै २०२२ हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा आणि अभिमानास्पद क्षण ठरला. याच दिवशी द्रौपदी मुर्मू यांची भारताच्या १५व्या राष्ट्राध्यक्षा म्हणून निवड झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर विराजमान होणाऱ्या त्या पहिल्या आदिवासी महिला ठरल्या, तर भारताच्या दुसऱ्या महिला राष्ट्रपती बनण्याचा मानही त्यांना मिळाला.ओडिशा राज्यातील मयूरभंज जिल्ह्यातील उपरबेड़ा या छोट्याशा गावात २० जून १९५८ रोजी त्यांचा जन्म झाला. संथाळ आदिवासी समाजातून आलेल्या द्रौपदी मुर्मू यांनी अत्यंत साध्या आणि संघर्षमय परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतर त्यांनी विविध सामाजिक आणि राजकीय जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. ओडिशा विधानसभेच्या सदस्य म्हणून त्यांनी काम केले तसेच राज्य सरकारमध्ये मंत्रीपदाची जबाबदारीही सांभाळली.२०१५ ते २०२१ या कालावधीत त्यांनी झारखंडच्या राज्यपालपदाची धुरा सांभाळली. झारखंडच्या पहिल्या महिला राज्यपाल म्हणून त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या कार्यशैलीमुळे आणि जनसामान्यांशी असलेल्या जवळिकीमुळे त्यांना सर्व स्तरांतून आदर मिळाला.राष्ट्रपती निवडणुकीची मतमोजणी २१ जुलै २०२२ रोजी पार पडली आणि त्यामध्ये द्रौपदी मुर्मू यांनी विजय मिळवत इतिहास रचला. त्यानंतर २५ जुलै २०२२ रोजी त्यांनी राष्ट्रपतीपदाची शपथ घेतली.द्रौपदी मुर्मू यांची निवड ही केवळ एका व्यक्तीचा विजय नसून भारतीय लोकशाहीच्या सर्वसमावेशकतेचा, सामाजिक न्यायाचा आणि समान संधीच्या मूल्यांचा विजय मानला जातो.

## भारतीय क्रिकेटला लाभलेला अष्टपैलू हिरा : चंदू बोर्डे

**जन्मदिन विशेष**

२१ जुलै १९३४ रोजी भारतीय क्रिकेट इतिहासातील एक महान अष्टपैलू खेळाडू आणि कुशल प्रशासक म्हणून ओळखले जाणारे चंदू बोर्डे यांचा जन्म झाला. महाराष्ट्रातील पुणे येथे जन्मलेल्या चंदू बोर्डे यांनी आपल्या दमदार फलंदाजी आणि उपयुक्त गोलंदाजीच्या जोरावर भारतीय क्रिकेटमध्ये वेगळी ओळख निर्माण केली.१९५८ ते १९७० या कालावधीत त्यांनी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत ५५ कसोटी सामने खेळले. या काळात त्यांनी ३ हजारांहून अधिक धावा करत अनेक संस्मरणीय खेळी केल्या. फलंदाजीबरोबरच त्यांनी मध्यमगती गोलंदाज म्हणूनही संघासाठी महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या अष्टपैलू कामगिरीमुळे ते भारतीय क्रिकेट संघाचे



महत्त्वाचे सदस्य बनले होते.विशेषतः संकटाच्या काळात संघाला सावरण्याची क्षमता आणि शांत स्वभावामुळे ते सहकाऱ्यांमध्ये लोकप्रिय होते. देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आणि अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा दिली. रणजी क्रिकेटमधील त्यांचे योगदानही तितकेच मोलाचे मानले जाते.खेळाडू म्हणून कारकीर्द संपल्यानंतरही चंदू बोर्डे यांनी भारतीय क्रिकेटची सेवा सुरू ठेवली. त्यांनी भारतीय संघाचे व्यवस्थापक, प्रशिक्षक तसेच राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष म्हणून महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय क्रिकेटला अनेक गुणवत्तापूर्ण खेळाडू लाभले. भारतीय क्रिकेटच्या जडणघडणीत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून त्यांच्या अनुभवाचा भारतीय क्रिकेटला मोठा फायदा झाला.क्रिकेटमधील शिस्त, संघभावना आणि खेळाडू घडविण्याची त्यांची दृष्टी यामुळे ते भारतीय क्रिकेटमधील आदर्श व्यक्तिमत्त्व मानले जातात. अनेक माजी आणि विद्यमान क्रिकेटपटूंनी त्यांच्याकडून प्रेरणा घेतली असून त्यांच्या योगदानाबद्दल वेळोवेळी गौरवोद्गार काढले आहेत.भारतीय क्रिकेटमधील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत भारत सरकारने त्यांना अर्जुन पुरस्कार, पद्मश्री आणि पद्मभूषण या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित केले. खेळाडू, मार्गदर्शक आणि प्रशासक अशा विविध भूमिकांमधून भारतीय क्रिकेट समृद्ध करणाऱ्या चंदू बोर्डे यांचे नाव भारतीय क्रीडा इतिहासात कायम आदराने घेतले जाते. त्यांचे कार्य आणि योगदान भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरत राहील.

# शाश्वत जलसंपदा व्यवस्थापनासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन आवश्यक - मुख्य अभियंता हरिभाऊ गिते





युवावार्ता (प्रतिनिधी)

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभाग व सिव्हिल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत जलसंपदा व्यवस्थापन व जलसंवर्धन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मृद व जलसंधारण चे मुख्य अभियंता हरिभाऊ गिते हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित जलसंपदा व्यवस्थापन, पाणी संवर्धन आणि भविष्यातील जलसुरक्षेचे महत्त्व यावर सखोल विवेचन केले. असेल निनो मुळे होणारं वातावरण बद्दल , वाढती लोकसंख्या, हवामान बदल आणि पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता जलस्त्रोतांचे वैज्ञानिक व्यवस्थापन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. गावातील धरणे, बंधारे, तलाव, नाले, पाझर तलाव व इतर जलसाठा संरचनांमध्ये साचलेला गाळ काढून त्यांची मूळ साठवण क्षमता पुनर्संचयित करण्याची आवश्यकता असल्याचे ह्या कार्यक्रम राज्यभर शासमामाफत चालु असुन यातून लाखो लिटर पाणी क्षमता वाढ होवुन हाजरो हेक्टर सुपिक जमिन तयार होत आहे असे त्यांनी अधोरेखित केले. जलसंवर्धनाच्या माध्यमातून भूजल पातळी वाढविणे, सिंचन क्षमता वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाई टाळणे शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. जलयुक्त शिवारसदृश जलसंधारण कामे, मृदसंवर्धन, जलसाठा निर्मिती, नाला खोलीकरण व रुंदीकरण, कंटूर ट्रेंच, शेततळी, वनक्षेत्र विकास, जलसंधारण प्रकल्प आणि नैसर्गिक साधनसंपत्ती संवर्धन यांसारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होत असल्याचे त्यांनी सांगितले. यासोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना शासकीय क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींविषयी मार्गदर्शन केले. केंद्रीय व राज्य शासनाच्या अभियांत्रिकी विभागांमध्ये स्थापत्य अभियंत्यांसाठी मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

शासकीय सेवेत निवड होण्यासाठी विशेष सुविधा आवश्यक नसून यशासाठी केवळ सातत्यपूर्ण अभ्यास, प्रामाणिक मेहनत, आत्मविश्वास आणि ध्येयाप्रती समर्पण आवश्यक असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी शब्दांत सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील योग्य नियोजन व जिद्दीच्या जोरावर स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यातील जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या शासकीय अभियांत्रिकी विभागात अमृतवाहिनी महाविद्यालयाचा किमान एक अभियंता कार्यरत असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट तांत्रिक शिक्षण, दर्जेदार सुविधा आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन देऊन सक्षम व जबाबदार स्थापत्य अभियंते घडविण्याचे कार्य महाविद्यालय सातत्याने करत असल्याबद्दल त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले. महाविद्यालय प्राचार्य डॉ पी आर बाविस्कर यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयुरी गाढे यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमास स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. चेतन एस. कडलग. प्रा. विश्वास कुलकर्णी , डॉ सचिन कांडेकर यांचे सह ,प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा बँक निवडणुकीच्या निमित्ताने प्रा. राम शिंदे - बाजीराव खेमनर यांची भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी साकूर (ता. संगमनेर) येथे जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते बाजीराव खेमनर यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाल्याने राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रा. शिंदे यांनी, खेमनर यांच्या सहकार, राजकारण व समाजकारणातील प्रदीर्घ अनुभवाचे कौतुक केले. वयाच्या ९१व्या वर्षीही त्यांची कार्यतत्परता आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा दृष्टिकोन प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, जिल्हा बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून सभापती प्रा. शिंदे जिल्हाभर दौरे करत आहेत. दुसरीकडे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील विरोधात पातीका अ चर्चा रंगली असून, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत राजकीय समीकरणे कशी बदलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे तर माजी मंत्री बाळासाहेब थोरात निवडणुकीत कोणती भूमिका घेणार, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जुन्या वादातून युवकावर कोयत्याने वार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहरातील इंदिरानगर प्रभागातील मंडप डेकोरेशन व्यावसायिक युवकावर जुन्या वादाच्या कारणातून भर दुपारी कोयत्याने वार करण्यात आले. ही घटना शनिवार (ता. १८ जुलै) रोजी दुपारी घडली. या घटनेत प्रथमेश अशोक पावडे (वय २३) रा. इंदिरानगर गल्ली क्रमांक १ हा युवक गंभीर जखमी झाला आहे.

याबाबत प्रथमेश पावडे याने पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्याचे एक वर्षापूर्वी तनुष गोडगे (पूर्ण नाव पत्ता माहित नाही) याच्या सोबत भांडण झाले होते.

शनिवार (दि. १८) रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास मित्रांसमवेत म्हसोबा मंदिरासमोरील मैदानावरील बाकड्यावर गप्पा मारत बसलो असताना तेथे तनुष गोडगे, रा. इंदिरानगर गल्ली क्र. ४ संगमनेर हा आला. मागील भांडणावरून माझ्याकडे बघून तुझा आता जामीन झाला असून मी तुला आता जीवंत सोडणार नाही असे म्हणत त्याच्या हातातील लोखंडी कोयता माझ्या डोक्यात मारु लागला. त्यावेळी मला शुभम जाधव याने मागे लोटल्याने कोयत्याचा वार माझ्या उजव्या हाताच्या खांद्यावर लागला. मी खाली पडल्याने तनुष गोडगे याने माझ्या छातीत मारहाण केली. तसेच माझ्या गळयातील चांदीची चेन व पॅण्टच्या खिश्यातील १९ हजार रुपये काढून घेत मला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या फिर्यादीनुसार संगमनेर शहर पोलीस ठाण्यात तनुष गोडगे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# टेम्पो-कारचा भीषण अपघातात दहा जखमी

युवावार्ता (प्रतिनिधी)-

नाशिकः येथून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मालवाहू टेम्पोचा पुणे-नाशिक महामार्गावरील एकोणावीस मैलावरील गतिरोधकावर स्टेअरिंग रॉड तुटल्याने तो थेट दुसऱ्या लेनवर जावून कारला धडकला. यामध्ये नऊ प्रवासी जखमी झाले असून त्यातील दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. सदर अपघात रविवारी (दि.१९) मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास घडला.

याबाबत डोळासणे महामार्ग पोलीस केंद्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक येथून टेम्पो (क्र. एमएच.१५, जेसी. ३९८३) कुंदनकुमार मन्सा चौहान (वय ३२, रा. अमोगपूर, ता. मुगलसराय, जि. चंडौली, उत्तर प्रदेश) हा नाशिक येथून पुण्याच्या दिशेने घेवून जात होता. दरम्यान, महामार्गावरील एकोणावीस सैल येथे आला असता गतिरोधकावर स्टेअरिंग

रॉड तुटून तो थेट दुसऱ्या लेनवर जावून कारला (क्र. एमएच.१५, जीएल. ९०२७) धडकला. यामध्ये कारमधील चालक प्रकाश सोमनाथ पालवे (वय २५), विष्णू फासाळे (वय ४०), भगवान एकनाथ फासाळे, भगवान नवसू फरसाळे, हिराबाई रमेश पालवे (सर्व रा. इरनारे, ता. जि. नाशिक) व इतर असे एकूण नऊ ते दहा प्रवासी जखमी झाले. यातील दोघे गंभीर आहेत.

या घटनेची माहिती मिळताच डोळासणे महामार्ग प्रौलीस मदत केंद्राचे सहायक पोलीस निरीक्षक रावसाहेब बांबळे यांच्यासह पोहेकॉ. आठरे, पोकॉ. सानप, दुसिंगे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमींना आळेफाटा व संगमनेरातील कुटे हॉस्पिटलमध्ये रुग्णवाहिकेतून



उपचारार्थ हलविले. अपघातग्रस्त वाहने टोल प्रशासनाच्या सहकार्याने रस्त्याच्या बाजूला घेतले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

शिक्षण प्रसारक संस्था व ध्रुव ग्लोबल स्कुलचे चेअरमन मालपाणी उद्योग समूहाचे संचालक
मा. डॉ. संजयजी मालपाणी
यांना
वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा !
दैनिक युवावार्ता | YUVA POLYPRINT & PACKAGING INDUSTRIES



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क ॲण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात नागरिकांच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबवा - सुर्यवंशी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयातील ढिसाळ आणि बेफिकीर कारभाराचा प्रत्यक्ष अनुभव शिवसेना शहरप्रमुख श्री. विनोद सूर्यवंशी यांना आला असून रुग्णालय प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य अक्षरशः रामभरोसे सोडण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.



विनोद सूर्यवंशी हे आपल्या लहान बाळाला एंटी रेबीज लसीकरणासाठी घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात गेले असता तेथे आरोग्य सेवेचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसून आले. बालरोग विभागातील तज्ज्ञ डॉक्टर कोर्ट काम असल्याचे कारण सांगून गैरहजर असल्याने अनेक पालक आपल्या लहान मुलांना घेऊन तासन्तास डॉक्टरांची वाट पाहत बसले होते. तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे इतर विभागातील डॉक्टरांकडून लहान मुलांची तपासणी केली जात असल्याचेही निदर्शनास आले.

बालरोग विभागासाठी नियुक्त तज्ज्ञ डॉक्टर अनुपस्थित असताना मुलांच्या आरोग्याची जबाबदारी कोण घेणार? संबंधित विषयातील तज्ज्ञ नसलेल्या डॉक्टरांकडून उपचार होणे ही अत्यंत गंभीर बाब असून यामुळे बालकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप विनोद सूर्यवंशी यांनी केला आहे.

याहूनही धक्कादायक बाब म्हणजे रुग्णालयाचे मुख्य प्रभारी डॉ. जऱ्हाड हे कायमच संपर्काबाहेर असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने केल्या जात आहेत. अनेक वेळा त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही ते फोन उचलत नसल्याने रुग्णालयातील समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

शासन ग्रामीण भागातील नागरिकांना चांगली आरोग्य सेवा मिळावी यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करत आहे. मात्र घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयातील काही अधिकाऱ्यांच्या आणि डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांना साध्या उपचारांसाठीही त्रास सहन करावा लागत आहे. गरीब, शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवाशी खेळ करणारा हा प्रकार अजिबात खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा शिवसेना शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी यांनी दिला.

तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ चौकशी करून जबाबदार अधिकारी आणि गैरहजर डॉक्टरांवर कठोर कारवाई करावी, रुग्णालयातील आरोग्य सेवा सुरळीत करावी आणि नागरिकांना दर्जेदार उपचार उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# कोकणगावच्या तुळजाभवानी मंदिरासाठी 20 लाखांचा निधी

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात व आ. सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्याला यश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राचे माजी महसूल व शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या सततच्या पाठपुराव्यातून १७१ गावे असलेल्या संगमनेर तालुक्यातील प्रत्येक गावात मंदिरांसाठी मोठा निधी देण्यात आला आहे. त्यामुळे सर्व गावांमध्ये समाज मंदिरांसह अद्यावत मंदिरे झाली असून माजी मंत्री बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्यातून प्रादेशिक पर्यटन विकास अंतर्गत तुळजाभवानी मंदिरासाठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



कोकणगाव येथे तुळजाभवानी माता मंदिराच्या सभा मंडपासाठी वीस लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून या कामाचा शुभारंभ संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष सुरेश थोरात व हरिभक्त परायण भागवत बाबा यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी सरपंच सौ.आशाताई जोंधळे, तंटामुक्तीचे अध्यक्ष शिवाजी जोंधळे, उपसरपंच दिलीप जोंधळे, ड सुरेश जोंधळे, पोपट थोरात, मधुकर पवार, संभाजी जोंधळे, डॉ दत्तात्रय जोंधळे ,नानासाहेब वायकर, हनुमंत जोंधळे, मारुती जोंधळे ,बाबासाहेब वायकर ,बाबू नाना वायकर ,दिगंबर जोंधळे, तुकाराम जोंधळे, नवनाथ वायकर, कचरू जोंधळे ,सुरेश वायकर ,विलास जोंधळे, सचिन वायकर, रहीमपूरचे पोलीस पाटील आबासाहेब शिंदे ,बाबासाहेब शिंदे बंटी वायकर ,पप्पू वायकर, इंजिनीयर जोंधळे व इंजिनिअर शिंदे आदींसह विविध ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुरेश थोरात म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यात प्रत्येक मंदिरांसाठी मोठा निधी देण्यात आला आहे अगदी देवकवठे पासून बोटापर्यंत प्रत्येक गावामध्ये समाज मंदिरांसह विविध मंदिरे अत्यंत आदर्शवत पद्धतीने उभी राहिली आहेत. वारकरी संप्रदायाचा विचार जोपासताना लोकनेते बाळासाहेब थोरात त्यांनी सर्व जाती धर्मांच्या लोकांना बरोबर घेत त्यांच्या श्रद्धा जपल्या आहेत. कोकणगाव परिसराच्या विकासासाठी सातत्याने निधी दिला असून श्री क्षेत्र निझर्वेश्वर देवस्थानसाठी ही मोठा निधी दिला आहे. या अंतर्गत या परिसरामध्ये सुशोभीकरणासह विविध अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

तर हरिभक्त परायण भागवत बाबा म्हणाले की, संगमनेर तालुका हा वारकरी संप्रदायाच्या विचारांचा तालुका राहिला आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी मानवता धर्म जोपासून कायम वारकरी संप्रदायाचा विचार पुढे नेला आहे. प्रत्येक मंदिरांसाठी त्यांनी मोठी मदत केली असून आषाढी वारी निमित्त कोकणगाव मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे ते म्हणाले. ॲड सुरेश जोंधळे यांनी प्रास्ताविक केले तर शिवाजी जोंधळे यांनी आभार मानले.

**संगमनेर तालुक्यात कोकणगाव येथील निझरनेश्वर, खांडगाव येथील खांडेश्वर, धांदरफळ बुद्रुक येथील रामेश्वर, जवळे बाळेश्वर येथील बाळेश्वर, कोकणगाव येथील दुधेश्वर, अमृतेश्वर यांसह विविध महादेवांच्या मंदिरांना पर्यटन विकास योजनेअंतर्गत मोठा निधी दिला असून हे सर्व तीर्थक्षेत्र सर्व भाविकांचे मोठे श्रद्धास्थान आहे या सर्व क्षेत्रांचा विकास माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून झाला असल्याचे सुरेश थोरात यांनी म्हटले आहे.**

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✼ कर्ज रक्कम वाढ । ✼ कर्ज व्याजदर कमी । ✼ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# देवगावात 'टेंभा आंदोलन'चा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - देवगाव व परिसरात गेल्या काही दिवसांपासून महावितरणकडून रात्रीच्या वेळी वारंवार आणि दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. सततच्या अघोषित वीजखंडितीमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

रात्रीच्या अंधारामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि लहान मुलांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. याशिवाय चोरीच्या घटना, वन्य प्राण्यांचा तसेच साप-विंचूंचा धोका वाढल्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. शेतकरी, लघुउद्योजक आणि व्यावसायिकांचेही वीजखंडितीमुळे आर्थिक नुकसान होत असल्याचे सांगण्यात आले.

वीजपुरवठा सुरळीत ठेवणे ही महावितरणची मूलभूत जबाबदारी असून, देवगाव व परिसरातील रात्रीचा वीजपुरवठा तातडीने नियमित करण्यात यावा तसेच वारंवार होणाऱ्या अघोषित वीजखंडितीवर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी समस्त ग्रामस्थांनी केली आहे.

महावितरणने या समस्येची तातडीने दखल घेतली नाही, तर ग्रामस्थांच्या वतीने महावितरणच्या निषेधार्थ 'टेंभा आंदोलन' करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनात ग्रामस्थ हातात टेंभा (मशाल) घेऊन शांततामय व लोकशाही मार्गाने सहभागी होणार असून, हे आंदोलन कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि मूलभूत हक्कासाठी असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॅमिनार ऑपरेशन थिएटर
शस्त्रक्रिया
• मेंदुविकार शस्त्रक्रिया • किडनी शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्योरोपण • मुत्रविकार शस्त्रक्रिया
• गुडघा प्रत्यारोपण • दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
• पोटाच्या शस्त्रक्रिया • आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू । कांजीवरम । सिल्क पैठणी । बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी ♦ योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे ♦ गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे ♦ विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे ♦ गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी ♦ लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग ♦ संभोगात रस न येणे
♦ स्तनांची वाढ न होणे ♦ संभोगा विषयीची भीती
♦ स्तनातून दूध न येणे ♦ हस्तमैथूनाची सवय
♦ स्तनात गाठी ♦ लैंगिक विकृती
♦ स्तनाचा कर्करोग ♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय् KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25